महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८२०४५५
दिनांक २४ सप्टेंबर, २०२४

## निविदा सूचना

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे वाहन चालक या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकुण २ कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे तसेच शिपाई या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकूण १३ अकुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. किमान ५ वर्षे अनुभव असणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याऱ्या पात्र संस्था तसेच निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक पात्र नोंदणीकृत संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक २०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग४, दिनांक ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार स्पर्धेत भाग घेणाऱ्या निविदाकाराने भरावयाच्या ना-परतावा निविदा शुल्क (Tender fees-Non Refundable) आणि बयाणा रकमेचा तपशील दिलेला असून त्यानुसार निविदा शुल्क रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) व निविदेची बयाणा रक्कम (EMD) रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) धनादेश "SECTION OFFICER URBAN DEVELOPMENT DEPARTMENT" या नावाने नगर विकास विभाग,मुख्य इमारत, चौथा मजला, मंत्रालय, मुंबई/रोखशाखा यांचेकडे जमा करणे आवश्यक राहील. प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दिनांक ०७.१०.२०२४ रोजी निवड समिती समोर सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यानंतर निविदाकारांची पात्र/अपात्र यादी महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. पात्र निविदाकारांची वाणिज्यिक निविदा उघडण्याबाबतची सूचना संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर फेटाळण्याचे अधिकार नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई याना राहतील.

(देवानंद शे.महाजन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**नगर विकास विभागांतर्गत "शिपाई" (१३ पदे)या पदांकरीता कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी निविदा मागविणे**

**सर्वसाधारण अटी/शर्थी , अर्हता, वेतन , सेवाशुल्क, वेळापत्रक व तांत्रिक अर्हता याबाबतचा तपशिल**

निविदाधारकांकडून वाणिज्यिक निविदा मागविण्यात येत असून किमान ०५ वर्षाचा अनुभव असलेल्या संस्थांनीच निविदा सादर करावी. अनुभवाची अट शिथिल केली जाणार नाही. निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईनरित्या निविदा प्रसिद्धीचा दिनांक | दि. २४ सप्टेंबर, २०२४ |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० ते दि.०४ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त. |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | दि. ०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. |

**२. निविदाधारक संस्थेस लागू असलेल्या अटी व शर्ती पूढीलप्रमाणे आहेत :-**

**(अ) शिपाई पदाकरीता पुढील अर्हता असणे आवश्यक आहे :-**

१. उमेदवार भारताचा नागरीक असावा व त्यास मराठी भाषा बोलता, लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षाच्या दरम्यान असावे.

३. उमेदवाराने किमान माध्यमिक शाळा प्रमाणप्रत्र परीक्षा (S. S.C.) उत्तीर्ण केलेली असावी.

४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

५. संस्थेकडून पुरविण्यात येणारे उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.

**(ब) निविदाकाराकडे पुढील तांत्रिक अर्हता असणे आवश्यक आहे :-**

१. निविदाकाराने सहकारी संस्था अधिनियम/कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी अथवा बचतगट म्हणून नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

२. निविदाकाराकडे वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GST) भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

३. निविदाकाराकडे Permanent Account Number (PAN) असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेच्या नावाने सन २०२१-२२, २०२२-२०२३ व २०२३-२४ या कालावधीचे आयकर भरल्याची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

४. निविदाकाराकडे सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षातील एकूण उलाढालीचे सनदी लेखापालाचे (CA) प्रमाणपत्र आणि त्यावर वैध UDIN क्रमांक नमूद असणे अनिवार्य राहील.

५. निविदाकाराकडे व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा व्यवसाय कर भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

६. कामगार कायदा, १९७० नुसार वैध कंत्राटी कामगार नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७. राज्य कामगार विमा योजना अधिनियम, १९४८ अन्वये वैध नोंदणी प्रमाणत्र असणे आवश्यक आहे. तसेच कामगार विमा हप्ता भरल्याची अद्ययावत पावती सोबत जोडणे आवश्यक आहे.

८. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा, १९५२ अंतर्गत वैध नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वर्गणी भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

९. आर्थिक वर्ष सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ मध्ये संस्थेची वार्षिक उलाढाल सरासरी रु.१००.०० लक्षच्या वर असणे आवश्यक आहे.

१०. संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे व त्यासंबंधीचा कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

११. निविदा सादर करण्याच्या तारखेस संस्थेची नोंदणी झाल्यापासून किमान ५ वर्षे झालेली असावी.

१२. संस्थेने शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये दिनांक ०१.०१.२०२१ ते ३१.१२.२०२३ या कालावधीत ४० किंवा अधिक कुशल/अकुशल कर्मचारी सेवा पुरविलेल्या किमान ३ कार्यालयांचे आदेश सादर करणे आवश्यक आहे.

१३. ज्या संस्थांना निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम (EMD) भरण्यापासून शासनाने सूट दिलेली आहे, त्या संस्थांनी सदर रक्कम/शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि ज्या आदेश/नियमांनुसार सूट अनुज्ञेय आहे, त्या कागदपत्रांची तसेच यासंदर्भात यथास्थिती सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या पत्र/आदेश/प्रमाणपत्राची प्रत असणे आवश्यक आहे.

**(क) संस्था/निविदाकाराची अंतिम निवड झाल्यानंतर द्यावयाचे हमीपत्र/प्रतिज्ञापत्र**

१. निविदेमध्ये दर्शविण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार मनुष्यबळ पुरविण्याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारास रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर पुढील बाबींसंदर्भात प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक आहे :-

(अ) शासकीय/निमशासकीय कार्यालयाने काळ्या यादीत समावेश केलेला नाही.

(ब) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अंतर्गत किंवा भारतीय दंड संहितेखाली किंवा वेळोवेळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली अपराधी ठरविण्यात आलेले नाही अथवा निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास मनाई करण्यात आलेली नाही.

(क) निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.

(ड) शासनास आवश्यकता भासल्यास १३ पेक्षा जास्त मनुष्यबळ पुरविण्यात येईल तसेच आवश्यकता भासल्यास स्वीकृत केलेल्या दरानेच दिनांक ३०.११.२०२६ नंतर देखील मनुष्यबळ सेवा पुरविण्यात येईल.

(इ) निविदेच्या अनुषंगाने पुरविण्यात आलेली सर्व माहिती/कागदपत्रे सत्य व अचूक आहेत. सदर माहिती/कागदपत्रे खोटी किंवा बनावट असल्याचे आढळून आल्यास संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच संस्थेशी करण्यात आलेला करार कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार नगर विकास विभागास राहतील.

(फ) संस्थेने पुरविलेली मनुष्यबळ सेवा असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास, संस्थेशी केलेला करार कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार नगर विकास विभागास राहतील.

(ग) निविदा स्वीकृतीसंदर्भात निवडसमिती सदस्यांवर कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास निविदाकार संस्था प्रमुखावर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार नगर विकास विभागास राहतील.

३. **वेतन** :-

रु. २१,४८०/- इतके ठोक वेतन अनुज्ञेय राहील. यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल -

अ) दरमहा रु. २१,४८०/- इतके वेतन (विमा हप्ता, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी इत्यादींसह)

ब) वर नमूद वेतनावरील १८% वस्तु व सेवा कर (GST) रु. ३,८६६/-

४. **सेवाशुल्क** :- वर नमूद परिच्छेद ३ (अ) मधील वेतनाच्या रकमेवर सेवाशुल्क (%) स्वतंत्रपणे नमूद करावे. **१% पेक्षा कमी सेवाशुल्क आकारण्यात आल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.**

**खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निविदेमध्ये वरील परिच्छेद ३ व ४ मधील दरमहा वेतन व सेवा कर (GST) आणि सेवा शुल्काची अचूक नोंद करण्यात यावी.**

| अ.क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | वेतन | रु.२१,४८०/- |
| २ | वस्तू व सेवा कर (GST) १८% | रु.३,८६६/- |
| ३ | सेवा शुल्क | निविदाकाराने सेवा शुल्काचा दर टक्केवारीमध्ये नोंदवावा |

**५. निविदाकाराने खालीलप्रमाणे कागदपत्रे दि. ०४.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत offline पध्दतीने सादर करणे अनिवार्य राहील :-**

परिच्छेद क्र. २ (ब) मध्ये नमूद तांत्रिक अर्हतेबाबतची कागदपत्रे परिच्छेद क्र. २ (ब) मध्ये नमूद केलेल्या क्रमानुसारच सही शिक्क्यानिशी सीलबंद लिफाफ्यामध्ये खाली नमूद पत्त्यावर दि.०४.१०.२०२४ पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे.

२. तसेच सोबतच्या परिशिष्ट "ब" मधील माहिती दि.०४.१०.२०२४ पर्यंत खालील पत्त्यावर सादर करावी.

पत्ता :-" कक्ष अधिकारी,नवि-३, नगर विकास विभाग, ४ ला मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२."

**६. निविदाकाराची अंतिम निवड :-**

अर्हतेमध्ये पात्र ठरलेल्या संस्थांच्याच वाणिज्यिक निविदा विचारात घेण्यात येतील. वरील परिच्छेद ३ मध्ये नमूद रु.२१,४८०/- पेक्षा कमी अथवा जास्त वेतन नोंदविले असल्यास तसेच १% पेक्षा कमी सेवाशुल्क आकारले असल्यास, अशा निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

वाणिज्यिक निविदेमध्ये शिपाई सेवा पुरवठा करण्याकरीता प्रति मनुष्यबळ प्रतिमहिना नोंदविलेल्या सेवा शुल्काच्या एकूण दरामध्ये जो निविदाकार सर्वात कमी (परंतू १% पेक्षा कमी नाही) सेवाशुल्काचा दर नोंदविल, त्या न्यूनतम निविदाकारास (L1) अंतिम निवड झालेले निविदाकार म्हणून घोषित करण्यात येईल. एकापेक्षा अधिक निविदाकारांचे न्यूनतम दर समान असल्यास, 1) केवळ शासकीय कार्यालयात मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव (आतापर्यंत कर्मचारी पुरविल्याची संख्या व कालावधी), २) आर्थिक उलाढाल (सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४) आणि ३) निवड समितीस योग्य वाटतील अशा गुणवत्तेच्या बाबी विचारात घेऊन संस्थेची अंतिम निवड करण्यात येईल व निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

**७. सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

१. निविदा फी रक्कम रू. १०,०००/-( अक्षरी रु. दहा हजार फक्त) धनाकर्ष (DD) अदा करण्यात यावी.

२. निविदेची बयाणा रक्कम (EMD) रु.१,००,०००/-(अक्षरी रु. एक लाख फक्त) धनाकर्ष स्वरुपात अदा करण्यात यावी.

३ निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर, यशस्वी निविदाधारक सोडून निविदा स्वीकृत न झालेल्या इतर निविदाधारकांची बयाना रक्कम (EMD) धनाकर्ष (DD) त्यांना परत करण्यात येईल. निविदा फी परत करण्यात येणार नाही.

४. अंतिम निवड झालेल्या निविदाधारकास मागणीनुसार मनुष्यबळाचा पुरवठा करणे अनिवार्य राहील. मनुष्यबळ सेवा पुरवठा करण्याकरिता दोन वर्षांच्या कालावधीसाठी करारनामा करण्यात येईल.

५. वित्त विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार न्यूनतम निविदाधारकास (अंतिम झालेले L1 निविदाकार) मनुष्यबळ पुरवठा आणि इतर अटी शर्तीबाबत करारनामा करणे बंधनकारक राहील.

६. प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहील.

७. शासनाकडून वेतन देयक अदा करण्यापूर्वीच कंत्राटदार संस्थेने त्यांच्या निधीतून कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे आणि वेतनचिठ्ठी देणे अनिवार्य राहील. वेतन अदा करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिन प्रतिकर्मचारी रु.५००/- इतका दंड कंत्राटदार संस्थेस आकारण्यात येईल.

८. वरिल परिच्छेद ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन अदा केल्यानंतर कंत्राटदार संस्थेने पुरवठा केलेल्या मनुष्यबळाच्या वेतनाचे मासिक देयक प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत नगर विकास विभागाकडे जमा करावे. तद्नंतर मंजूर दरानुसार २१ दिवसांत रक्कम कंत्राटदार संस्थेस अदा करण्यात येईल. कंत्राटदार संस्थेस कोणत्याही प्रकारचे अग्रीम वेतन देण्यात येणार नाही.

९.निविदा सादर करते वेळेसच निविदा फी व बयाना रक्कम धनाकर्ष (EMD) SECTION OFFICER, URBAN DEVELOPMENT DEPARTMENT यांचे नावे काढलेले सादर करावे.

१०. कंत्राटदार संस्थेशी झालेल्या करारानुसार नगर विकास विभागाच्या मागणीप्रमाणे पदांसाठी विहित केलेल्या अर्हतेचे कर्मचारी उपलब्ध करून देणे संस्थेस बंधनकारक आहे. संस्थेने मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून करारामध्ये नमूद केल्यानुसार मनुष्यबळ उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा प्रति दिन, प्रति कर्मचारी रू.२००/- इतका दंड संस्थेकडून घेण्यात येईल अथवा संस्थेच्या अनामत रक्कमेतून सदर दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

११. कंत्राटी शिपाई १३ पदांकरिता अकुशल कर्मचारी मनुष्यबळाची सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने यापेक्षा कमी अथवा अधिक पदांकरिता मनुष्यबळ सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिल्यास, निर्देशाप्रमाणे मनुष्यबळ सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील व त्याप्रमाणे कंत्राटदार संस्थेस वेतन वितरीत करण्यात येईल.

१२. संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा शिपाई उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. उमेदवाराच्या सचोटी व चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला करारामध्ये नमूद करण्यात आलेल्या मुदतीमध्ये संस्थेने सादर करणे बंधनकारक असेल. कार्यालयीन कामकाजात उमेदवाराकडून कसूर

अथवा आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील आणि झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संबंधित संस्थेकडून करण्यात येईल.

१३. कंत्राटदार संस्थेकडून उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांच्या सेवा पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाच्या असून, त्यांना भविष्यात या पदांवर नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच कायमस्वरूपी शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत. तसेच त्यांच्या सेवेचे उत्तरदायित्व शासनावर असणार नाही तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा असमाधानकारक वाटल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्याचा/अथवा बदलून मिळण्याचा अधिकार नगर विकास विभागास राहील व सदरील बाब संस्थेवर बंधनकारक राहील.

१४. कंत्राटदार संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या उमेदवाराचे करार कालावधीत निधन झाल्यास उमेदवार/संस्था यांना शासनातर्फे कोणतीही भरपाई अनुज्ञेय असणार नाही, तसेच उमेदवारास कोणत्याही प्रकारची गंभीर इजा झाल्यास अथवा त्या अनुषंगाने तात्पुरते किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास त्याच्या उपचाराच्या खर्चाचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी "वर्क्समन कॉम्पेनसेशन ॲक्ट, १९२३" मधील तरतुदीनुसार संबंधित संस्थेची राहील. तशा आशयाचे बंधपत्र यशस्वी निविदाकारास कराराचे वेळी द्यावे लागेल.

१५. शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक त्या गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची जबाबदारी संबंधित शिपायाची तसेच संस्थेची असेल. गोपनीयतेचा भंग झाल्यास त्या संदर्भात संस्था तसेच संबंधित शिपायावर कायदेशीर कारवाई करण्याचे हक्क नगर विकास विभागास राहतील.

शिपाई यांनी गैरवर्तन/गंभीर चुका केल्यास त्याच्यावर फौजदारी / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१६. कंत्राटदार संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या उमेदवारांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत कार्यालयात उपस्थित असणे बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात थांबावे लागेल. तसेच वेळप्रसंगी कामाची निकड विचारात घेऊन सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील.

१७. संबंधित शिपायांनी शासनाच्या कार्यालयीन मालमत्तेची काळजी घेणे/देखभाल करणे आवश्यक राहील, शासनाच्या झालेल्या नुकसानाची जबाबदारी संबंधित संस्थेवर असेल व झालेल्या नुकसानाची वसुली संस्थेकडून करण्यात येईल.

१८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, **शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/कामगार-८, दि.२२.०२.२०१९** नुसार कंत्राटी शिपायास निश्चित होणारे मूळ वेतन २१४८०/-चे विवरण खालीलप्रमाणे सादर करावे.

| अ.क्र. | विविध कामगार कायद्यांन्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार अनुज्ञेय वेतन, भत्ते व वजावटी |
|---|---|
| १ | मूळ वेतन |
| २ | भविष्य निर्वाह निधी (PF) |
| ३ | राज्य कामगार विमा योजना (ESIS) कर्मचारी नुकसान भरपाई (W.C.) |
| ४ | व्यावसायिक कर(P.T.) |

१९. कंत्राटदार संस्थेद्वारे प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भत्ते लागू होणार नाहीत.

२०. कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व नगर विकास विभाग यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते मुंबई शहर येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च सबंधित संस्थेचा राहील.

२१. निवड झालेल्या संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास तसेच करारातील अटींचे उल्लंघन केल्यास, संस्था अपात्र ठरविण्यात येवून संस्थेची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२२. मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने अन्य सेवा पुरवठादार संस्थेशी उपकरार करण्यास प्रतिबंध आहे. तथापि, संस्थेने अशा प्रकारे उपकरार केल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेशी करण्यात आलेला करार रद्द करण्यात येवून संस्थेने भरलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल आणि संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२३. मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक उमेदवाराचे संपूर्ण नाव, वास्तव्याचा पत्ता, शैक्षणिक अर्हतेचा तपशिल, नमुना स्वाक्षरी, कायमस्वरूपी वास्तव्याचा पत्ता इत्यादी माहिती व पासपोर्ट साइज फोटो उपलब्ध करून द्यावा.(आधारकार्ड/पॅनकार्ड)

२४. मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता शासनाच्या प्रचलित सर्व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२५. संस्थेने उपलब्ध करुन दिलेला कंत्राटी कर्मचारी वारंवार गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आल्यास, विभागाच्या मागणीनुसार/आवश्यकतेनुसार पर्यायी कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन देणे कंत्राटदार संस्थेस बंधनकारक राहील.

२६. निविदा मसुद्याचे सूक्ष्म अवलोकन करून परिपूर्ण निविदा सादर करण्याची दक्षता निविदाकाराने घ्यावी.

२७. कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा तसेच मनुष्यबळाच्या संख्येत वाढ/घट करण्याचा अधिकार नगर विकास विभागास राहील.

( सोबत परिशिष्ट "अ" व "ब")

****

## -: कंत्राटी शिपाई पदाकरीता पुढील अर्हता असणे आवश्यक आहे :-

## परिशिष्ट-(अ)

१. उमेदवार भारताचा नागरीक असावा व त्यास मराठी भाषा बोलता, लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षाच्या दरम्यान असावे.
३. उमेदवाराने किमान माध्यमिक शाळा प्रमाणप्रत्र परीक्षा (S. S.C.) उत्तीर्ण केलेली असावी.
४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
५. संस्थेकडून पुरविण्यात येणारे उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.

## परिशिष्ट-(ब)

## निविदाकाराकडे पुढील तांत्रिक अर्हता असणे आवश्यक आहे :-

१. निविदाकाराने सहकारी संस्था अधिनियम/कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी अथवा बचतगट म्हणून नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

२. निविदाकाराकडे वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GST) भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

३. निविदाकाराकडे Permanent Account Number (PAN) असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेच्या नावाने सन २०२१-२२, २०२२-२०२३ व २०२३-२४ या कालावधीचे आयकर भरल्याची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

४. निविदाकाराकडे सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षातील एकूण उलाढालीचे सनदी लेखापालाचे (CA) प्रमाणपत्र आणि त्यावर वैध UDIN क्रमांक नमूद असणे अनिवार्य राहील.

५. निविदाकाराकडे व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा व्यवसाय कर भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

६. कामगार कायदा, १९७० नुसार वैध कंत्राटी कामगार नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

७. राज्य कामगार विमा योजना अधिनियम, १९४८ अन्वये वैध नोंदणी प्रमाणत्र असणे आवश्यक आहे. तसेच कामगार विमा हप्ता भरल्याची अद्ययावत पावती सोबत जोडणे आवश्यक आहे.

८. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा, १९५२ अंतर्गत वैध नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच जून २०२४, जुलै २०२४ व ऑगस्ट २०२४ या अलीकडील ३ महिन्यांचा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वर्गणी भरलेली पावती असणे आवश्यक आहे.

९. आर्थिक वर्ष सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ मध्ये संस्थेची वार्षिक उलाढाल सरासरी रु.१००.०० लक्षच्या वर असणे आवश्यक आहे.

१०. संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे व त्यासंबंधीचा कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

११. निविदा सादर करण्याच्या तारखेस संस्थेची नोंदणी झाल्यापासून किमान ५ वर्षे झालेली असावी.

१२. संस्थेने शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये दिनांक ०१.०१.२०२१ ते ३१.१२.२०२३ या कालावधीत ४० किंवा अधिक कुशल/अकुशल कर्मचारी सेवा पुरविलेल्या किमान ३ कार्यालयांचे आदेश सादर करणे आवश्यक आहे.

१३. ज्या संस्थांना निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम (EMD) भरण्यापासून शासनाने सूट दिलेली आहे, त्या संस्थांनी सदर रक्कम/शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि ज्या आदेश/नियमांनुसार सूट अनुज्ञेय आहे, त्या कागदपत्रांची तसेच यासंदर्भात यथास्थिती सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या पत्र/आदेश/प्रमाणपत्राची प्रत असणे आवश्यक आहे.